# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**5 JULY, 2018**

[Time : 11-30]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(30 Words Per Minute)

**SECTION - II**

(Time Allowed : 7 Minutes)

**मराठी टंकलेखन**

(३० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - २**

(वेळ : ७ मिनिटे)

**सूचना :** गती उतारा एकदा टंकलिखित झाल्यावर पुन्हा तोच उतारा टंकलिखित करु नये. खालील मजकूर डाव्या बाजूस १५ पदे समास सोडून द्विपंक्ती अंतराने टंकलिखित करा.

---

**[गुण : ४०]**

तिबेटच्या प्रदेशात सातवा विमानतळ उभारण्याचे काम चीनने हाती घेतले आहे. याच वर्षी या विमानतळाच्या उभारणीचे काम हाती घेतले जाणार आहे. दाऊ गावाजवळ हा विमानतळ उभारला जात आहे.

या प्रदेशातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी हा उपक्रम राबवला जाणार आहे असे चीनतर्फे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात मात्र तिबेटी भूभागावरील आपली पकड मजबूत करण्याच्या उद्देशातूनच हे काम केले जात असल्याचे तिबेटी सूत्रांचे म्हणणे आहे. नव्याने उभारला जाणारा हा विमानतळ ३७८० मीटर उंचीवर असून त्याच्या उभारणीसाठी एकशे चौऱ्याऐंशी दशलक्ष डॉलर्स इतका खर्च येणार आहे. या विमानतळाची क्षमता वर्षाला ऐंशी हजार प्रवाशांची असून एअरबस तीनशे एकोणीस व
बोईंग सातशे सदतीस अशी मोठी विमानेही येथे उतरू शकतील. ज्या भागात हा इतका मोठा विमानतळ उभारला जाणार आहे त्या भागाची लोकसंख्या मात्र केवळ एक लाख ऐंशी हजार इतकी आहे. तिबेटचा हा सारा भाग डोंगराळ आणि खराब हवामानासाठी प्रसिद्ध आहे. येथे दरवर्षी मोठ्या प्रमाणात बर्फवृष्टी होत असते. तिबेट हा भाग अति दुर्गम व बर्फाच्छादित असल्याने लोकवस्ती विरळ आहे.